GOVERNMENT OF MAHARASHTRA
STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI
Head Office : 305, Government Polytechnic Building, Kherwadi, Ali Yawar Jung Marg, Bandra (E) Mumbai - 400 051.
Regional Office : CET Cell, (DMER) Opp. Govt. Dental College, St. Georges Hospital Campus, Fort, Mumbai 400 001.
: CET Cell, Directorate of Technical Education, 3, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org

No.State CET CELL/AIA PGET Ayurved/Notice No.9/1039/2017 **Date : 09th Oct.2017**

# NOTICE

## AIA-PGET-Ayurved/Unani 2017

It is hereby informed to all concerned candidates that the fee of Postgraduate courses in Govt. Aided Ayurved/Unani Colleges vide Govt. Resolution Medical Education and Drugs Department No.PGA-1215/C.R.311/15/Edu-2, dt.22-9-2017 has to be finalized by Fee Regulatory Authority. Therefore, the fees charged for Postgraduate Ayurveda/Unani courses in Govt. Aided Colleges from the year 2017-18 will be charged as prescribed by "Fees Regulatory Authority, Mumbai".

( A.E.Rayate) IAS
Competent Authority and Commissioner,
State CET CELL,
Maharashtra State, Mumbai

आयुर्वेद संचालनालयाचे कार्यालय, मुंबई
1205
26 SEP 2017

शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयातील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्र. पीजीए-१२१५/प्र.क्र.३११/१५/शिक्षण-२,
नववा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१,
दिनांक : २२ सप्टेंबर,२०१७

संदर्भ : वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एएमसी-१००७/ ६२८/ प्र.क्र.१४८/०७ / शिक्षण-२, दिनांक ०१.०३.२०११

**प्रस्तावना :**

राज्यात विविध शासनअनुदानित आयुर्वेद महाविद्यालयात विनाअनुदानित तत्वावर पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु आहेत. सदर महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमास बीएएमएस अभ्यासक्रमास वेतन/वेतनेत्तर अनुदान शासनामार्फत देण्यात येते. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या शासकीय व शासन अनुदानित महाविद्यालयातील शुल्क ठरविण्याबाबत उपरोक्त शासननिर्णय दिनांक ०१.०३.२०११ अन्वये धोरण ठरविण्यात आले आहे. तथापि, शासन अनुदानित आयुर्वेद/युनानी महाविद्यालयातील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क ठरविण्यासंदर्भात सध्या कोणतेही धोरण नसल्याने विविध शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांकडुन विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या अभ्यासक्रमांकरीता वेगवेगळे शुल्क आकारणी करण्यात येते. या संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपुर येथे दाखल रिट याचिका क्रमांक ६२४९/२०१५,श्री आयुर्वेद महाविद्यालय, नागपुर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर आणि रिट याचिका क्रमांक ६३३४/२०१५, रा. तो. आयुर्वेद महाविद्यालय, अकोला विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या न्यायालयीन प्रकरणांमध्ये दिनांक २१.११.२०१६ रोजी दिलेले स्वतंत्र न्यायनिर्णयांच्या अनुषंगाने, राज्यातील शासन अनुदानित आयुर्वेद महाविद्यायातील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चितीकरीता धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

राज्यातील शासन अनुदानित आयुर्वेद/युनानी महाविद्यालयातील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे सन २०१७-१८ पासुनचे शुल्क खालीलप्रमाणे ठरविण्यात येईल.

१. राज्यातील शासन अनुदानित आयुर्वेद/युनानी महाविद्यालयांतील विना अनुदान तत्वावर सुरु असलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शुल्क महाराष्ट्र विना अनुदानित खासगी व्यावसायिक शिक्षण संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन ) अधिनियम, २०१५ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारा निश्चित करण्यात येईल.

D:\GR\GR NEW.docx

२. शुल्क निश्चिती सदर प्रक्रियेला उक्त अधिनियमात विहीत करण्यात आलेली कार्यपध्दता याकरीता अनुसरण्यात यावी.

३. सदर महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमांस शासनाचे अनुदान प्राप्त होत असल्याचे संचालक, आयुष संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत उक्त प्राधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात येईल.

४. शासनअनदुनित आयुर्वेद/युनानी महाविद्यालयातील विना अनुदान तत्वावर सुरु करण्यात आलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरीता स्वतंत्रपणे शासनामार्फत कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.प्र.धानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
सर्व सह/उप सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
अधिष्ठाता/प्राचार्य, सर्व शासन अनुदानित आयुर्वेद/युनानी महाविद्यालये.
निवड नस्ती ( कार्यासन – शिक्षण-२).

D:\GR\GR NEW.doc